| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १२.०२.२०१४. |
| नोंदणी दिनांक | : | १२.०२.२०१४. |
| न्यायनिर्णय दिनांक | : | २१.०१.२०२३ |
| कालावधी–०८ वर्ष ११ महिने १९ दिवस | | |

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, शिराळा यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी श्री.श.अ.सुरजुसे)

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. १०३/२०२२**

**(जुना कि.फौ.अर्ज नं.१७/२०१४)** **निशाणी क्र. ______.**

**CNR-MHSN-14000750/2022**

श्रीमती सुवर्णा तानाजी पाटील,
अंदाजे वय ३० वर्ष, धंदा – शेती व घरकाम,
रा. सागांव, ता. शिराळा, जि. सांगली. } **फिर्यादी**

**विरुध्द**

१. शिवाजी पांडुरंग पाटील,
अंदाजे वय ४७ वर्ष, धंदा – नोकरी,
२. सौ. राजश्री शिवाजी पाटील,
अंदाजे वय ४२ वर्ष, धंदा – घरकाम,
दोघे रा. सागांव, ता. शिराळा, जि. सांगली. } **आरोपी**

---

फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. पाटील.

आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम.डी. पाटील.

---

## न्यायनिर्णय

(दिनांक – १८.०१.२०२३ ला पारित)

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३१ च्या गुन्ह्याकरिता खटला आहे.

फिर्यादी पक्षाची हकीकत थोडक्यात अशी आहे की,

२. फिर्यादीने आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुध्द न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शिराळा येथे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम १२ नुसार किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२२/२०१२ दाखल केला होता. सदर अर्ज दिनांक २४.०१.२०१४ रोजी गुणदोषावर निकाली निघाला. त्याप्रमाणे आरोपी क्र.१ व २ यांनी सागांव येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.१२२ व भुमापन क्र.१५३/१ मधील घर मिळकतीला लावलेले कुलूप एक महिन्याच्या आत काढून घेण्याबाबत आदेश दिलेले होते. दिनांक १०.०२.२०१४ रोजी सकाळी ०९.०० वाजता फिर्यादी आणि सुभाष भिमराव पाटील हे सदर मिळकतीत गेले आणि आरोपींना कुलुपे काढण्याबाबत आणि घरामध्ये प्रवेश मिळण्याबाबत विचारणा केली. आरोपी क्र.१ व २ यांनी त्याकरीता नकार दिला. फिर्यादीने पोलीस ठाणे, शिराळा येथे दिनांक ११.०२.२०१४ रोजी सदर आदेशाच्या अंमलबजावणी करीता पोलीस संरक्षणाची मागणी केली. परंतु, पोलीसांनी माननीय न्यायालयाच्या आदेशाविना पोलीस मदत मिळू शकत नाही, असे सांगितले. सबब, फिर्यादीने आरोपीला नमुद गुन्ह्याकरीता शिक्षा व दंड करण्याचा आणि आदेशाची अंमलबजावणी करीता पोलीस संरक्षण मिळण्याबाबत विनंती केली.

३. माझे पूर्व न्यायीक अधिकारी यांनी सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र.१ व २ यांचा जबाब (नि.२४) अभिलेखात सामावून घेतला आणि दोन्ही पक्षांच्या साक्षीदारांची साक्ष नोंदविली. परंतु, महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

अधिनियमाचे कलम ३१ प्रमाणे गुन्हा होत असल्याने आणि त्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेमधील नमुद तरतुदींचा अवलंब करणे आवश्यक असल्याने मी आदेश दिनांक २७.०७.२०२२ आणि २०.०८.२०२२ प्रमाणे सदर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१७/२०१४ बंद केला आणि प्रकरण पुन्हा नोंदविण्याचा आदेश केला. त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरण पुन्हा नोंदविले.

४. त्यानंतर, फिर्यादीने पुरसीस (नि.५२) प्रमाणे तत्पूर्वी नोंदविलेल्या साक्षी पुराव्या व्यतिरिक्त इतर साक्ष द्यायची नसल्याचे कळविले. त्याप्रमाणे मी दोन्ही पक्षांना ऐकून आदेश दिनांक ०३.१२.२०२२ प्रमाणे आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुध्द उपरोक्त गुन्ह्याचे दोषारोप (नि.५३) आणि त्यांचे स्वतंत्र प्रतिकथन (नि.५४ व ५५) नोंदविले. फिर्यादीने पुरसीस (नि.५६) प्रमाणे जादा पुरावा देणे नसल्याबाबत कळविले. मी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (अ) व (ब) याप्रमाणे आरोपी क्र.१ व २ यांचे जबाब (नि.५७ व ५८) नोंदविलेत. आरोपींनी खोट्या गुन्ह्यात गुंतविल्याचा बचाव घेतला. सदरचा बचाव आरोपींचा जबाब आणि उलटतपासाची पध्दत यावरुन ग्राह्य धरला.

५. मी अभिलेखावरील उपलब्ध पुरावे, कागदपत्रे व युक्तीवाद यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरुन माझ्या विचारार्थ खालील प्रश्न उद्भवले व मी त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिलेत.

| | **<u>विचारार्थ प्रश्न</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१**. | फिर्यादी पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १०.०२.२०१४ रोजी सकाळी ९.०० वाजता, आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी किरकोळ अर्ज नं.२२/२०१२ मधील आदेश दिनांक २४.०१.२०१४ प्रमाणे, सागांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं. १२२ आणि सर्व्हे नं.१५३/१ मध्ये प्रवेश करण्यासाठी तिला | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अडथळा केला व सदर आदेशाचा भंग केला आणि त्याद्वारे त्यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ३१ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. दोन्ही पक्षांच्या साक्षीदारांची यादी येणेप्रमाणे-

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सुवर्णा तानाजी पाटील (फिसाक्र-१) | तक्रारदार | १६ |
| २. | शिवाजी पांडुरंग पाटील (बसाक्र-१) | आरोपी क्र.१ | ३१ |
| ३. | राजश्री शिवाजी पाटील (बसाक्र-२) | आरोपी क्र.२ | ३२ |

७. फिर्यादी पक्षाने किर.फौ.अर्ज क्र.२२/२०१२ च्या निकालाची प्रत (नि.८) यावर भिस्त ठेवली. बचाव पक्षाने ७/१२ उतारा (नि.३४) आणि किर.फौ.अर्ज क्र. २२/२०१२ मधील फिर्यादीच्या पुराव्याची साक्षांकित प्रत (नि.३८) यावर भिस्त ठेवली.

### विचारार्थ प्रश्न क्र. १ बाबत -

८. फिर्यादी पक्षाकरिता विद्वान अधिवक्ता श्री. एस.एस. पाटील यांनी युक्तीवाद केला की, आरोपींनी नमुद आदेशाचे पालन केलेले नाही. त्याकरीता फिर्यादीची एकमेव साक्ष पुरेसी आहे. त्याप्रमाणे आरोपींनी नमुद गुन्हा केलेला आहे. त्यांनी आरोपींना नमुद गुन्ह्याकरीता शासित करण्याची विनंती केली.

९.        बचाव पक्षाकरीता विद्वान अधिवक्ता श्री. एम.डी. पाटील यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादीने आरोपींना वडिलोपार्जित जमीनीत जास्तीचा हिस्सा मिळावा म्हणुन त्रास देण्याकरीता खोटी फिर्याद दाखल केली. फिर्यादीच्या जबाबावरुन नमुद मिळकतींना कुलूप लावलेले असल्याचे आणि घरात प्रवेश देण्यास अडथळा केल्याचे संशयास्पद आहे. त्यामुळे, आरोपींनी आदेशाचा भंग केला किंवा फिर्यादीला प्रवेश करण्यास अडथळा केला हे संशयास्पद आहे. त्यामुळे, गुन्हा निष्पन्न होत नाही. सबब, आरोपींना संशयाच्या फायद्यामध्ये निर्दोष करण्याची विनंती केली.

१०.        मी उपलब्ध अभिलेख, पुरावे आणि युक्तीवाद यांचे काळीपूर्वक अवलोकन केले. येथे सर्व प्रथम नमुद गुन्ह्याच्या दृष्टिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम १८ आणि ३१ चे अवलोकन करणे आवश्यक आहे.

***कलम १८– सुरक्षा आदेश***.– *व्यथित व्यक्ती आणि प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि प्रथमदर्शनी दंडाधिकाऱ्याची अशी खात्री झाली असेल की कौटुंबिक हिंसाचार घडला आहे किंवा घडण्याची शक्यता आहे, तर व्यथित व्यक्तीच्या बाजूने सुरक्षा आदेश मंजूर करु शकेल आणि प्रतिवादीला पुढील गोष्टीस मनाई करु शकेल –*

*अ)   कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करणे;*

*ब)   कौटुंबिक हिंसाचारास प्रोत्साहन किंवा सहाय्य करणे.*

*क)   व्यथित व्यक्तीच्या नोकरीच्या ठिकाणी किंवा जर व्यथित व्यक्ती मूल असेल ती, त्याच्या शाळेच्या ठिकाणी किंवा व्यथित व्यक्ती वेळोवेळी जाईल त्या ठिकाणी प्रवेश करण्यास मज्जाव करणे;*

*ड)   व्यथित व्यक्तीबरोबर कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष भेटीद्वारे, तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा दूरध्वनी च्या माध्यमातून संपर्क साधणे;*

*इ) दोन्ही पक्षकार एकत्रपणे व्यथित व्यक्तीच्या आणि प्रतिवादी किंवा प्रतिवादीच्या एकट्याच्या वापरात असलेली किंवा तिने धारण केलेली किंवा उपभोगत असलेली कोणतीही मालमत्ता दुसऱ्याच्या स्वाधीन करणे, खात्याचा वापर करणे तसेच तीचे स्त्रीधन किंवा त्या दोघांनी एकत्रितपणे किंवा स्वतंत्रपणे धारण केलेली इतर कोणतीही मालमत्ता दंडाधिका–याच्या परवानगीशिवाय बँक, वापरता येणार नाही.*

*फ) व्यथित व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती, किंवा तिला कौटुंबिक हिंसाचारापासून सहाय्य करणारे यांच्यावर हिंसाचार करण्यास मज्जाव करणे.*

***कलम ३१ –** प्रतिवादीने सुरक्षा आदेशाचा भंग केल्यास शास्ती (१) प्रतिवादीने सुरक्षा आदेशाचा किंवा अंतरिम सुरक्षा आदेश यांचा भंग केल्यास या अधिनियमाखाली अपराध ठरेल आणि त्याला एक वर्षापर्यंतची कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रुपयांपर्यंतची दंडाची शिक्षा किंवा दोन्हीही होऊ शकतील. –*

*(२) पोट–कलम (१) अन्वये आरोपीने अपराध केला असेल त्या घडलेल्या अपराधाची सुनावणी ज्या दंडाधिकाऱ्याने आदेश दिला असेल त्याने शक्यतो करावयाची आहे.*

*(३) पोट–कलम (१) अन्वये दोषारोप निश्चित करताना दंडाधिकारी भारतीय दंड संहिता (१८६० चा अधि. ४५) यातील कलम ४९८–अ किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदी अन्वये किंवा हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ (१९६१ चा अधि. २८) या अन्वयेसुध्दा जर अपराधातील घटना उघड झाल्या असतील तर दंडाधिकारी दोषारोप निश्चित करेल.*

**११.** सुवर्णा (फिसाक्र–१) हिने पुर्वीचा अर्ज आणि त्यामधील आदेश याबाबत सविस्तर कथन केलेले आहे. बचाव पक्षाने सदरची साक्ष खोडलेली नाही, याउलट त्याअनुषंगाने साक्ष गोळा केली. शिवाजी (बसाक्र–१) आणि राजश्री (बसाक्र–२) यांनी सुध्दा त्याअनुषंगाने कथन केलेले आहे. यथास्थितीत, सदरची

बाब संशयापार सिध्द झाली. किर.फौ.अर्ज क्र.२२/२०१२ मधील आदेशाची प्रत (नि.८) प्रमाणे सदर आदेश व त्यातील तथ्य सिध्द झालेले आहे. प्रस्तुत गुन्ह्याच्या दृष्टिने सदर आदेशाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. ते येणेप्रमाणे –

**आदेश**

*१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.*

*२. जाबदार क्र.१ व २ यांनी अर्जदार क्र.१ हिला ग्रामपंचायत मिळकत १२२ व स.न.१५३/१ मधील घरात प्रवेश करण्यापासून रोखण्याचे नाही किंवा हरकत करण्याचे नाही.*

*३. जाबदार क्र.१ व २यांनी ग्रामपंचायत मिळकत क्र.१२२ व स.नं.१५३/१ या घर मिळकतीत लावलेले कुलूप या आदेशापासून एक महिन्याच्या आत काढून घ्यावे.*

*४. अर्जदाराच्या उर्वरित मागण्या नामंजूर करण्यात येते आहेत.*

*५. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, शिराळा व पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, शिराळा यांना आवश्यक त्यावेळी आदेशाची अंमल बजावणी करण्यासाठी पाठविण्यात यावी.*

*६. अर्जदार व जाबदार यांना आदेशाची प्रत विनामुल्य द्यावी.*

**१२.** महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम ३१ च्या तरतुदीप्रमाणे पिडीतेचा आदेशाच्या भंगाबाबतचा एकमेव पुरावा हा स्विकारण्याजोगा आहे. परंतु, आदेशाचे स्वरुप ठरविण्याकरीता आदेशातील मजकूर महत्वाचा आहे. यथास्थितीत, नमुद आदेश क्र.२ व ३ हे प्रतिबंधात्मक आदेश आहेत, ते संरक्षणात्मक आदेश नाहीत. सबब, सुवर्णाचा एकमेव पुरावा त्याकरीता पुरेसा नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणामध्ये संरक्षणाचा आदेश होता व तो भंग झाला हे संशयास्पद आहे.

१३. किर.फौ.अर्ज क्र.२२/२०१२ मधील सुवर्णाच्या पुराव्याची प्रत (नि.३८) चे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांच्या वाटपाबाबत वाद असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामधील मजकूरावरुन तिने एक कुलूप लावलेले आहे. सदर बाब ही तिच्या कथनावर संशय उपस्थित करणारी आहे. दोन्ही पक्षांची साक्ष पुरावा आणि युक्तीवाद यावरुन त्यांच्यातील मालमत्तेच्या वाटपाबाबत वाद असल्याचे सिध्द होते. त्या अनुषंगाने फिर्यादीने आरोपींविरुध्द वेगवेगळी प्रकरणे दाखल केलेली आहेत. सर्व प्रकरणांचा हेतू हा फक्त मालमत्तेचे वाटप असल्याचे दिसून येते. त्यामुळे, निश्चितच दोन्ही पक्षांमध्ये एकमेकांविषयी द्वेश आहे.

१४. सुवर्णा (फिसाक्र-१) ने तिच्या उलट तपासामध्ये कबुल केले की, जिना हा अनंत व सर्जेराव यांच्या बाजूने आहे आणि तो आरोपी क्र.१ च्या भागामध्ये नाही. पुर्व बाजूचा जिना हा कृष्णदेव आणि संपत यांच्या हिश्यातून आहे. ती घरामध्ये जाण्यामध्ये दोन्ही बाजूंच्या जिन्याचा वापर करते. यावरुन हे निश्चित होते की, जिन्याचा वापर करण्याकरीता आरोपींनी फिर्यादीला कोणताही अडथळा केलेला नाही.

१५. सुवर्णा (फिसाक्र-१) हिने कबुल केले की, तिने सर्व्हे नं.१५३/१ मधील मिळकतीमधून सामान नेलेले आहे, त्याच्या किल्ल्या तिच्याकडे आहेत. सदरची बाब हे दर्शविते की, सदर मिळकतीचे कुलूप फिर्यादीच्या अधिपत्याखाली आहे. त्यामुळे, ते आरोपींचे कुलूप आहे किंवा आरोपींनी ते उघडण्याकरीता अडथळा केला, हे संशयास्पद आहे. सुवर्णा (फिसाक्र-१) च्या साक्षी प्रमाणे तिने पोलीस ठाण्यामध्ये पोलीस संरक्षणाची मागणी केली. परंतु, तिने घटनेबाबत पोलीस ठाण्यामध्ये खबर दिलेली नाही. तिने त्याबाबत पुरेसे कारण दिलेले नाही. सबब, त्याचा प्रतिकुल अर्थ काढता येतो.

१६. शिवाजी (बसाक्र–१) आणि राजश्री (बसाक्र–२) यांनी नमुद आदेशाचा भंग केलेला नाही, याबाबत साक्ष नोंदविली. दोन्ही साक्षीदारांनी फिर्यादी पक्षाच्या कथनाबाबतच्या सुचना नाकारल्यात. फिर्यादीच्या वतीने त्यांचा उलट तपास घेतला. त्या अनुषंगाने फिर्यादीच्या वतीने घराचे चार भाग, त्यामध्ये चौघांचा हिस्सा, त्यापैकी खालचा हिस्सा शिवाजी, वरचा हिस्सा सुवर्णा आणि बागीचे दोन हिस्से चुलत्यांच्या ताब्यात आहेत, याबाबत साक्ष गोळा केली. सदर बाब ही फिर्यादी आणि आरोपी यांची मिळकत वेगवेगळी ताब्यात असल्याचे दर्शविते. त्यामुळे, नमुद अडथळा हा संशयास्पद आहे.

१७. यथास्थितीत, मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो की, किर.फौ.अर्ज क्र.२२/२०१२ मध्ये फिर्यादीला संरक्षणाचा आदेश प्राप्त झालेला नाही. त्याचप्रमाणे आरोपींनी संरक्षणाच्या आदेशाचा भंग केलेला नाही. याउलट, फिर्यादीला सदर अर्जामध्ये प्रतिबंधात्मक स्वरुपाचे आदेश प्राप्त झाले होते. त्या आदेशाचा भंग झाला हे संशयास्पद आहे. तसेच, महत्वाचे म्हणजे प्रकरण प्रलंबित असताना, नमुद मिळकतीवर फिर्यादीचा ताबा आणि वहिवाट असल्याची शक्यता दिसून येते. त्यामुळे, सदर मिळकतीचे कथीत कुलूप काढण्याचे आणि फिर्यादीला त्यामध्ये प्रवेश देण्याबाबत पोलीस संरक्षणाची आवश्यकता नाही. सबब, आरोपींनी संरक्षणाच्या आदेशाचा भंग केला आणि त्याद्वारे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम ३१ प्रमाणे गुन्हा केला, हे सबळ आणि संशयापार पुराव्यानिशी सिध्द झालेले नाही. फिर्यादी ही गुन्ह्याची श्रुंखला आणि गुन्ह्याचे घटक सिध्द करण्यास असफल ठरली. सबब, आरोपींनी उपरोक्त किंवा इतर कोणताही गुन्हा केल्याचे सिध्द झालेले नाही. यथास्थितीत, मी विचारार्थ मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर दिले.

**विचारार्थ मुद्दा क्र.२ –**

१८. विचारार्थ मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी उत्तराप्रमाणे फिर्यादी पक्षाने

आरोपींविरुध्द नमुद गुन्हा संशयापार सिध्द केलेला नाही. सबब, आरोपी क्र.१ व २ हे नमुद गुन्ह्यातून निर्दोष होण्यास पात्र आहेत. आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) ची पूर्तता केलेली आहे. सबब, मी विचारार्थ मुद्दा क्र.२ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ व २ यांना महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम ३१ च्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१)अन्वये निर्दोष करण्यांत येते.

२. आरोपी कं.१ व २ यांची पुर्वीची जामीन बंधपत्रे रद्द करण्यांत येतात.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३(६) प्रमाणे आरोपी क्र.२ च्या गैरहजेरीमध्ये न्यायनिर्णय घोषित केल.

४. न्यायनिर्णय संगणकावर टंकलिखीत करुन खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

SHARAD AWADHUTRAO SURJUSE

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2023.01.23 13:27:52 +0530

दिनांक– २१.०१.२०२३. (श. अ. सुरजुसे)

शिराळा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, **शिराळा**.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.N. Pethkar (Steno. Grade-3) |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala. |
| Date | : | 21.01.2023. |
| Signed by Presiding Officer on | : | 21.01.2023. |
| Uploaded on | : | 23.01.2023. |

---